**सोलापूर महानगरपालिका**
**सभेचा इतिवृत्तांत**
**(मा.सर्वसाधारण संदर्भ)**
**उप-समिती बैठक क्रमांक -४४**

महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.३०.०८.२०२२ रोजी उपसमिती बैठक क्र.४३ सपंलेनंतर मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.

सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री.मच्छिंद्र घोलप | उपायुक्त |
| ५ | मा.श्री.संदिप कारंजे | नगरअभियंता |
| ६ | मा.श्री.करणकोट पी.व्ही. | सहा.मालमत्ता कर अधिकारी |
| ७ | मा.श्री.नजीर शेख | क्रिडा अधिकारी |

**मा.नगरसचिव : खातेप्रमुखाने अपेक्षीत मसुदा हातोहात दि.३०/०८/२०२२ रोजी सादर केला आहे यानुसार विषयाचा सारांश घेतला आहे.**

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | ९० | महाराष्ट्र रिकाम्या जमिनी अधिनियम १९७५ च्या कादायाप्रमाणे गलिच्छ वस्तु सुधारणा योजनामध्ये जाहीर करण्यात आलेल्या झोपडपट्टीवासियांकडून सेवा आकार, भुई भाडे, प्रशासकीय कर इ. वसुल करणेबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शन तत्वे ठरवून दिलेली आहेत. यासंदर्भामध्ये शासनाचे वेळोवेळी आलेले आदेश निर्गमित केलेले आहेत.<br>मा. महाराष्ट्र शासन गृहविभाग शासन निर्णय क्रमांक गवसु १२२०/प्र.क्र. २०४(१) झोपसु-१, मंत्रालय, मुबई -३२ दिनांक ११ जूलै,२००१अन्वये दिनांक १ जानेवारी १९९५ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतील झोपडीधारकांना ओळखपत्र (फोटोपास) देण्याबाबत शासनाचे सुधारित धोरणाबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यामुळे पा.नं.७ वर बाब क्रं.६ (ब) पात्र झ ोपडपट्टीवासियांना ओळखपत्र देताना दरमहा पुढीलप्रमाणे सेवाशुल्क, प्रशासकिय आकार व भुईभाडे आकारावे व ते दिनांक १-१-१९९५ पासून एकत्रित शुल्क म्हणून वसूल करण्यात यावे. यामध्ये १) सेवाशुल्क ४० टक्के २) प्रशासकीय आकार २० टक्के आणि भुईभाडे ४० टक्के याप्रमाणे राहील. या एकत्रित शुल्कातील विविध बाबींची टक्केवारी खालीलप्रमाणे राहिल असे दर्शविण्यात आलेले आहे. | सहा.मालमत्ता कर अधिकारी | **प्रकरणी प्रस्ताव कायदा, नियम याप्रमाणे आहे किंवा नाही, शास्ती माफी संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे तरतुदीनुसार आहे किंवा नाही या बाबीसह प्रकरण सविस्तर फेरसादर करणेस मान्यता देण्यात येत आहे** |

| ओळखपत्राचा प्रकार | क्षेत्र | नुकसान भरपाई (एकत्रित) दरमहा | शेरा |
| --- | --- | --- | --- |
| निवासी | २२५ चौ.फु. पर्यंत | रू. ५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.५० प्रति चौ. फूट दरमहा. |
| सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक | ------------- | दरमहा रूपये ०.२५ पैसे प्रति चौ. फूट | --------- |
| संयुक्त | २२५ चौ. फूट | रूपये १००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.७५ प्रति चौ. फूट दरमहा |
| अनिवासी | २२५ चौ. फुट पर्यंत | रूपये १५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये १/- प्रति चौ. फूट दरमहा |

वर नमूद तक्त्याप्रमाणे उक्त आदेशामध्ये नमूद बाब क्र ६ क बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील सेवाशुल्क इत्यादी यांचा दर वर नमूद केलेल्या दराच्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के राहील असे नमूद आहे. याचाच अर्थ बृहन्मुंबई महानगरपालिका व्यतिरिक्त महानगरपालिका क्षेत्रात ५० टक्के दर राहील असा होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेसाठी वरील तक्त्यानूसार सेवाशुल्क इत्यादी दर निश्चित करून कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अन्वये वरील तीन पैकी दोन बाबी मालमत्ता करात मोडत नाहीत. त्यामुळे गवसु विभागामार्फत सदर कर वसुली करण्यात आलेली नाही. परंतु कामाची सुसुत्रता आणि कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर बाबींची कर वसूली ही आकारणी व वसुली अधिकारी (गवसु) या कार्यालयामार्फत करणे आजला मनपाच्या आर्थिक हिताच्या व नियोजनाच्यादृष्टीने योग्य वाटते. कारण प्रत्येक मिळकतींच्या बिलामध्ये या बाबीची नोंद होऊन वसूल होते.तसेच गवसु अंतर्गत ज्या मिळकतीचे कर निर्धारण अधिनियमातील तरतूदीनूसार करण्यात आले नाही. त्यांचे देखील कर निर्धारण या अगोदर मंजूर करण्यात आलेल्या दराने करणे म्हणजे वेळोवेळी प्रचलित दराने आकारणी करुन नियमित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कार्यवाही करताना उक्त अधिनियमातील कलम १५० (अ) मधील तरतूदीनुसार सहा वर्षाच्या पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

वरील शासन निर्णयातील बाब क्र ७ मध्ये सेवाशुल्क, भुईभाडे व प्रशासकीय आकार (एकत्रित शुल्क वसूली) बाबत झोपडपट्टीमध्ये महानगरपालिका सेवा पुरवित असल्यामुळे सेवाशुल्क त्यांनीच वसुल करून त्यांच्याकडे जमा करावे असे नमूद आहे.

दरम्यान सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सालाचे स्थानिक निधी लेखापरिक्षण करण्यात आले होते त्यामध्ये आक्षेपातील परिच्छेद क्र८५ मध्ये सेवाकर व ८६ नुसार भुईभाडा, प्रशासकीय शुल्क वसूल होत नसल्याने तो वसुल करणेविषयी आक्षेपात नमूद करण्यात आलेले आहे. त्यावेळी चर्चेच्या अनुषंगाने सदरची बाब ही नगर अभियंता व भूमि व मालमत्ता विभागाशी निगडीत असल्याचे कळविणेत आले. मात्र त्याचवेळी सदर दोन्ही शुल्क हे कामाच्या सुसुत्रतेसाठी गवसु वसुली विभागाकडून करण्यात यावे असे सूचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे वरील आक्षेपातील परिच्छेद क्र.८६ नुसार सन दिनांक १-४-२०१५ पासून प्रशासकीय कर,भुईभाडे वरील तक्त्यात नमूदप्रमाणे वसुल करणेस तसेच आक्षेपातील परिच्छेद क्र. ८५ नुसार ज्या मिळकतदारांकडून फक्त सेवाकर वसूल करण्यात येते त्यांना या करासोबत नियमानुसार प्रचलित दराने कराची आकारणी करणेस तसेच ज्या मिळकतदारांना नियमानुसार कराची आकारणी चालू आहे त्यांना सेवाकर दिनांक १-४-२०१५ पासून लागू करणेस मा.सर्वसाधारण सभेकडे धोरणात्मक निर्णयासाठी पाठविणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमिती मार्फत मा.प्रशासक यांचे धोरणात्मक निर्णयासाठी मा.आयुक्त यांचे दि.१९/०८/२०२२ ने आलेले प्रकरण. **(ई-६९०७८) TAX** | | |
| २ | ९१ | क्रिडा विभागाकडील श्री.मार्कंडेय जलतरण तलाव व विजापूर रोड सुंदरम नगर येथील जलतरण तलाव हे दोन्ही जलतरण तलाव अभिकर्त्यामार्फत चालविणेकामी प्राप्त सर्वात जास्तीचे निविदाधारक अंजली कृष्णकूमार शर्मा यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या र.रु.३५,३५,३५०.३५ या दराने दोन्वही जलतरण तलाव ११ महिने कालावधी करीता त्यांना सक्षम मान्यते अंती देण्यात येत आहे.<br>प्रस्तुत प्रकरणी दोन्ही जलतरण तलावाकडील लॉकडाऊन कालावधीतील वार्षिक सभासदांना परतावा देण्यात येऊ नये. उर्वरित पंच वार्षिक, दशवार्षिक सभासदांच्या लॉकडाऊन कालावधीतील जलतरणचा लाभ न मिळाल्याने नुकसान झालेल्या ५० % दिवसाची मुदतवाढ देऊन त्यांची एकुण र.रु.१,०७,२५१/- इतकी रक्कम व चालू आर्थिक वर्ष सन २०२२-२३ मधील दि.२२/०४/२०२२ ते दि.३१/०८/२०२२ अखेर पोहण्याचे लाभ घेतलेले एकुण १२९ सभासदांची १००% रक्कम सोबतच्या यादी प्रमाणे उर्वरित रक्कम रु.२,३६,७३५/- इतकी १००% रक्कम असे एकुण र.रु.३,४३,९८६/- इतकी रक्कम संबंधीत अभिकर्त्यांना देण्याबाबत **निर्णयास्तव** मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२५/०८/२०२२ ने आलेले प्रकरण. **(ई-६८८१४) SPORTS** | क्रिडा अधिकारी | **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |
| ३ | ९२ | टि.पी. ०४ फा.प्लॉ.८९ येथील म.न.पा. शाळा क्र.२७ च्या लगत बी.ओ.टी मधुन बांधलेल्या इमारतीच्या वरील तिसरा, चौथा, पाचवा व सहावा मजल्याचे वाणिज्य इमारतीच्या वाढीव इमारत बांधणेकामी मा.सर्वसाधारण टराव क्र.५३ दि.१५/१२/२०२०, मा.सर्वसाधारण टराव क्र.६१ दि.१८/०६/२०२१ व मा.सर्वसाधारण टराव क्र.३२३ दि.२६/११/२०२१ ने ठराव पारित झाला आहे. सदर टरावाच्या अनुषंगाने वरील तीसरा, चौथा, पाचवा व सहावा मजल्याचे बांधकाम करणेकामी भाडेपट्टा जाहिर लिलाव करणेसाठी विना परतावा रक्कम नमूद करून जाहिर प्रसिध्दीकरण केले होते. | नगरअभियंता | **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण सुमारे ०६ ते ०७ वेळा करण्यात आले होते. सदरचे जाहिर प्रसिध्दीकरणास कोणतेही स्वरुपाचे प्रतिसाद मिळाला नाही. यापूर्वीच्या ठरावाप्रमाणे भाडेदर ई ऑक्शन प्रणाली माध्यमातून प्रतिसाद न मिळाल्याने प्रकरणी मा.सहा.संचालक, नगररचना यांचेकडून प्राप्त गाळे भाडे दरामध्ये कपात करून व सदरच्या गाळ्यासाठी निश्चित केलेली विना परतावा रक्कम ऐवजी अनामत रक्कम संबंधीत इच्छुक गाळेधारक यांचेकडून घेऊन सदर प्रस्तावास नमुद केलेली अनामत रक्कम करारपत्राच्या मुदतीअंती (२९ वर्ष ११ महिने नंतर) गाळेधारकास विना व्याज रितसर मागणी केल्यानंतर परत करण्याच्या अनुषंगाने व सदरची कार्यपध्दती निश्चित करणेकामी धोरणत्मक निर्णय होणेसाठी नकाशे व प्रस्तावासह शर्ती व अटी इत्यादी ई ऑक्शन (ऑफलाईन) करणेस प्राप्त देकार इत्यादी सविस्तर छाननी करणे व छाननीअंती प्राप्त देकारच्या अनुषंगाने शॉप ओनर निश्चित करून , शॉप ओनर बरोबर करारपत्र करून घेणे, कार्यादेश देणे इत्यादी बाबी करीता **धोरणात्मक मान्यतेस्व** प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.१४/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **धोरणात्मक निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२८/०८/२०२२ ने आलेले प्रकरण. | | |

सहा.मालमत्ता कर अधिकारी
सोलापूर महानगरपालिका

मा.क्रिडा अधिकारी
सोलापूर महानगरपालिका

मा.उपायुक्त
सोलापूर महानगरपालिका.

मा.नगरअभियंता
सोलापूर महानगरपालिका

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

# अपेक्षित मसुदा

महाराष्ट्र रिकाम्या जमिनी अधिनियम १९७५ च्या कायदायाप्रमाणे गलिच्छ वस्तु सुधारणा योजनामध्ये जाहीर करण्यात आलेल्या झोपडपट्टीवासियांकडून सेवा आकार, भुई भाडे, प्रशासकीय कर इ. वसुल करणेबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शन तत्वे ठरवून दिलेली आहेत. यासंदर्भामध्ये शासनाने सुधारीतपणे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहेत.

मा. महाराष्ट्र शासन गृहविभाग शासन निर्णय क्रमांक गवसु १२२०/प्र.क्र. २०४(१) झोपसु-१, मंत्रालय,मुंबई- ३२ दिनांक ११ जूलै, २००१ अन्वये दिनांक १ जानेवारी १९९५ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतील झोपडीधारकांना ओळखपत्र (फोटोपास) देण्याबाबत शासनाचे सुधारित धोरणाबाबत ,श निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यामध्ये पा.नं. ७ वर बाब क्र. ६ (ब) पात्र झोपडपट्टीवासियांना ओळखपत्र देताना दरमहा पुढीलप्रमाणे सेवाशुल्क, प्रशासकीय आकार व भुईभाडे आकारावे व ते दिनांक १-१-१९९५ पासून एकत्रित शुल्क म्हणून वसुल करण्यात यावे. यामध्ये १) सेवाशुल्क ४० टक्के २) प्रशासकीय आकार २० टक्के आणि भुईभाडे ४० टक्के याप्रमाणे राहील. . या एकत्रित शुल्कातील विविध बाबींची टक्केवारी खालीलप्रमाणे राहील असे दर्शविण्यात आलेले आहे.

| ओळखपत्राचा प्रकार | क्षेत्र | नुकसान भरपाई (एकत्रित) दरमहा | शेरा |
|---|---|---|---|
| निवासी | २२५ चौ. फु. पर्यंत | रु. ५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये ०.५० प्रति चौ. फूट दरमहा. |
| सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक | ------------- | दरमहा रुपये ०.२५ पैसे प्रति चौ. फूट | ----------------- |
| संयुक्त | २२५ चौ. फूट | रुपये १००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये ०.७५ प्रति चौ. फूट दरमहा. |
| अनिवासी | २२५ चौ. फूट पर्यंत | रुपये १५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये १/- प्रति चौ. फूट दरमहा. |

वर नमूद तक्त्याप्रमाणे उक्त आदेशामध्ये नमूद बाब क्र. ६ क बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील सेवाशुल्क इत्यादी यांचा दर वर नमूद केलेल्या दराच्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के राहल असे नमूद आहे. याचाच अर्थ बृहन्मुंबई महानगरपालिका व्यतिरिक्त महानगरपालिका क्षेत्रात ५० टक्के दर राहील असा होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेसाठी वरील तक्त्यानुसार सेवाशुल्क इत्यादी दर निश्चित करुन कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अन्वये वरील तीन पैकी दोन बाबी मालमत्ता करात मोडत नाहीत. त्यामुळे गवसु विभागामार्फत सदर कर वसुली करण्यात आलेली नाही. परंतु कामाची सुसुत्रता आणि कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर बाबींची कर वसूली ही आकारणी व वसुली अधिकारी (गवसु) या कार्यालयामार्फत करणे आजला मनपाच्या आर्थिक हिताच्या व नियोजनाच्यादृष्टीने योग्य वाटते. कारण प्रत्येक मिळकतीच्या बिलामध्ये या बाबींची नोंद होऊन वसूल होते. तसेच गवसु अंतर्गत ज्या मिळकतींचे कर निर्धारण अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात आले नाही त्यांचे देखील कर निर्धारण या अगोदर मंजूर, प्रचलित असलेल्या ~~करण्यात आलेल्या~~ दराने करणे तसेच आकारणी करुन नियमित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कार्यवाही करताना उक्त अधिनियमातील कलम १५०(अ) मधील तरतूदीनुसार सहा वर्षाच्या पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

वरील शासन निर्णयातील बाब क्र. ७ मध्ये सेवाशुल्क, भुईभाडे व प्रशासकीय आकार (एकत्रित शुल्क वसुली) बाबत झोपडपट्टीमध्ये महानगरपालिका सेवा पुरवित असल्यामुळे सेवाशुल्क त्यांनीच वसुल करुन त्यांच्याकडे जमा करावे असे नमूद आहे.

दरम्यान सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या सालाचे स्थानिक निधी लेखापरिक्षण करण्यात आले होते त्यामध्ये आक्षेपातील परिच्छेद क्र. ८५ मध्ये सेवाकर व ८६ नुसार भुईभाडे प्रशासकीय शुल्क वसूल होत नसल्याने तो वसुल करणेविषयी आक्षेपात नमूद करण्यात आलेले आ त्यावेळी चर्चेच्या अनुषंगाने सदरची बाब ही नगर अभियंता व भूमि व मालमत्ता विभागाशी निगडी असल्याचे कळविणेत आले. मात्र त्याचवेळी ~~त्याचवेळी~~ सदर दोन्ही शुल्क हे कामाच्या सुसुत्रतेसा गवसु वसुली विभागाकडून करण्यात यावे असे सूचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे वरी आक्षेपातील परिच्छेद क्र. ८६ नुसार सन दिनांक १-४-२०१६ पासून प्रशासकीय कर, भुईभाडे वरी तक्त्यात नमूदप्रमाणे वसुल करणेस ~~मान्यता देणेत येत आहे~~. तसेच आक्षेपातील परिच्छेद क्र. ८५ नुस ज्या मिळकतदारांकडून फक्त सेवाकर वसुल करण्यात येते त्यांना या करासोबत नियमानुसार प्रचलि दराने कराची आकारणी करणेस तसेच ज्या मिळकतदारांना नियमानुसार कराची आकारणी चालू अ त्यांना सेवाकर दिनांक १-४-२०१६ पासून लागू करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सन 2022-23 मध्ये नगरपालिका रिव्हीजन चालू असून, सदर रिव्हीजनमध्ये गवसु विभागाकडील मिळकतीची वाढीव बांधकामे, नवीन बांधकामे, व वापरातील बदल इत्यादींची आकारणी करताना सदर बांधकामावर कोणत्याही प्रकारची शास्ती व दंड न करता, नियमानुसार आकारणी ~~[illegible]~~ करून नियमित करणेस ही सभा मान्यता देत आहे.

प्र.अधि. मालमत्ता कर अधिकारी
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.९० ठराव क्र.९० दिनांक. ३०/०८/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)



महाराष्ट्र रिकाम्या जमिनी अधिनियम १९७५ च्या कायद्याप्रमाणे गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेमध्ये जाहीर करण्यात आलेल्या झोपडपट्टीवासियांकडून सेवा आकार, भुईभाडे, प्रशासकीय कर इ. वसुल करणेबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शन तत्वे ठरवून दिलेली आहेत. यासंदर्भामध्ये शासनाने सुधारीत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहेत.

मा. महाराष्ट्र शासन गृहविभाग शासन निर्णय क्रमांक गवसु १२२०/प्र.क्र. २०४(१) झोपसु-१, मंत्रालय, मुबई -३२ दिनांक ११ जूलै,२००१अन्वये दिनांक १ जानेवारी १९९५ पर्यत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतील झोपडीधारकांना ओळखपत्र (फोटोपास) देण्याबाबत शासनाचे सुधारित धोरणाबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यामध्ये पा.नं.७ वर बाब क्र.६ (ब) पात्र झोपडपट्टीवासियांना ओळखपत्र देताना दरमहा पुढीलप्रमाणे सेवाशुल्क, प्रशासकिय आकार व भुईभाडे आकारावे व ते दिनांक १-१-१९९५ पासून एकत्रित शुल्क म्हणून वसूल करण्यात यावे. यामध्ये १) सेवाशुल्क ४० टक्के २) प्रशासकीय आकार २० टक्के आणि ३) भुईभाडे ४० टक्के याप्रमाणे राहील. या एकत्रित शुल्कातील विविध बाबींची टक्केवारी खालीलप्रमाणे राहिल असे दर्शविण्यात आलेले आहे.

| ओळखपत्राचा प्रकार | क्षेत्र | नुकसान भरपाई (एकत्रित) दरमहा | शेरा |
|---|---|---|---|
| निवासी | २२५ चौ.फु. पर्यत | रू. ५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.५० प्रति चौ. फूट दरमहा. |
| सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक | ----------------- -- | दरमहा रूपये ०.२५ पैसे प्रति चौ. फूट | --------- |
| संयुक्त | २२५ चौ. फूट | रूपये १००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.७५ प्रति चौ. फूट दरमहा |
| अनिवासी | २२५ चौ. फुट पर्यत | रूपये १५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये १/- प्रति चौ. फूट दरमहा |

वर नमूद तक्त्याप्रमाणे उक्त आदेशामध्ये नमूद बाब क्र ६ क बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील सेवाशुल्क इत्यादी यांचा दर वर नमूद केलेल्या दराच्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के राहील असे नमूद आहे. याचाच अर्थ बृहन्मुंबई महानगरपालिका व्यतिरिक्त महानगरपालिका क्षेत्रात ५० टक्के दर राहील असा होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेसाठी वरील तक्त्यानूसार सेवाशुल्क इत्यादी दर निश्चित करून कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अन्वये वरील तीन पैकी दोन बाबी मालमत्ता करात मोडत नाहीत. त्यामुळे गवसु विभागामार्फत सदर कर वसुली करण्यात आलेली नाही. परंतु कामाची सुसुत्रता आणि कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर बाबींची कर वसूली ही आकारणी व वसुली अधिकारी (गवसु) या कार्यालयामार्फत करणे आजला मनपाच्या आर्थिक हिताच्या व नियोजनाच्यादृष्टीने योग्य वाटते. कारण प्रत्येक मिळकतींच्या बिलामध्ये या बाबीची नोंद होऊन वसूल होते.तसेच गवसु अंतर्गत ज्या मिळकतीचे कर निर्धारण अधिनियमातील तरतूदीनूसार करण्यात आले नाही. त्यांचे देखील कर निर्धारण या अगोदर मंजूर प्रचलित असलेल्या दराने करणे तसेच आकारणी करुन नियमित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कार्यवाही करताना उक्त अधिनियमातील कलम १५० (अ) मधील तरतूदीनुसार सहा वर्षाच्या पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

वरील शासन निर्णयातील बाब क्र ७ मध्ये सेवाशुल्क, भुईभाडे व प्रशासकीय आकार (एकत्रित शुल्क वसूली) बाबत झोपडपट्टीमध्ये महानगरपालिका सेवा पुरवित असल्यामुळे सेवाशुल्क त्यांनीच वसुल करून त्यांच्याकडे जमा करावे असे नमूद आहे.

दरम्यान सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या सालाचे स्थानिक निधी लेखापरिक्षण करण्यात आले होते त्यामध्ये आक्षेपातील परिच्छेद क्र.८५ मध्ये सेवाकर व ८६ नुसार भुईभाडा, प्रशासकीय शुल्क वसूल होत नसल्याने तो वसुल करणेविषयी आक्षेपात नमूद करण्यात आलेले आहे. त्यावेळी चर्चेच्या अनुषंगाने सदरची बाब ही नगर अभियंता व भूमि व मालमत्ता विभागाशी निगडीत असल्याचे कळविणेत आले. मात्र त्याचवेळी सदर दोन्ही शुल्क हे कामाच्या सुसुत्रतेसाठी गवसु वसुली विभागाकडून करण्यात यावे असे सूचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे वरील आक्षेपातील परिच्छेद क्र.८६ नुसार सन दिनांक १-४-२०१६ पासून प्रशासकीय कर,भुईभाडे वरील तक्त्यात नमूदप्रमाणे वसुल करणेस तसेच आक्षेपातील परिच्छेद क्र. ८५ नुसार ज्या मिळकतदारांकडून फक्त सेवाकर वसूल करण्यात येते त्यांना या करासोबत नियमानुसार प्रचलित दराने कराची आकारणी करणेस तसेच ज्या मिळकतदारांना नियमानुसार कराची आकारणी चालू आहे त्यांना सेवाकर दिनांक १-४-२०१६ पासून लागू करणेस मान्यता देणे तसेच सन २०२२-२३ मध्ये जनरल रिव्हिजनचालू असून सदर रिव्हिजन मध्ये गवसु विभागाकडील मिळकतीची वाढीव बांधकामे, नविन बांधकामे व वापरातील बदल इत्यादी संबंधीत आकारणी करताना सदर बांधकामावर कोणत्यही प्रकारची शास्ती व दंड न करता, नियमानुसार आकारणी करून नियमित करणेस मा.सर्वसाधारण सभेकडे **धोरणात्मक निर्णयासाठी** पाठविणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमिती मार्फत मा.प्रशासक यांचे **धोरणात्मक निर्णयासाठी** मा.आयुक्त यांचे दि.१९/०८/२०२२ ने आलेले **प्रकरणी प्रस्ताव कायदा, नियम याप्रमाणे आहे किंवा नाही, शास्ती माफी संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे तरतुदीनुसार आहे किंवा नाही या बाबीसह प्रकरण सविस्तर फेरसादर करणेस मान्यता देण्यात येत आहे**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका

## प्रशासक ठराव

## विषय क्र.९१ ठराव क्र.९१ दिनांक. ३०/०८/२०२२

## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )



क्रिडा विभागाकडील श्री.मार्कंडेय जलतरण तलाव व विजापूर रोड सुंदरम नगर येथील जलतरण तलाव हे दोन्ही जलतरण तलाव अभिकर्त्यांमार्फत चालविणेकामी प्राप्त सर्वात जास्तीचे निविदाधारक अंजली कृष्णकूमार शर्मा यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या **र.रु.३५,३५,३५०.३५** या दराने दोन्ही जलतरण तलाव ११ महिने कालावधी करीता त्यांना सक्षम मान्यते अंती देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दोन्ही जलतरण तलावाकडील लॉकडाऊन कालावधीतील वार्षिक सभासदांना परतावा देण्यात येऊ नये. उर्वरित पंच वार्षिक, दशवार्षिक सभासदांच्या लॉकडाऊन कालावधीतील जलतरणचा लाभ न मिळाल्याने नुकसान झालेल्या ५० % दिवसाची मुदतवाढ देऊन त्यांची एकुण र.रु.१,०७,२५१/- इतकी रक्कम व चालू आर्थिक वर्ष सन २०२२-२३ मधील दि.२२/०४/२०२२ ते दि.३१/०८/२०२२ अखेर पोहण्याचे लाभ घेतलेले एकुण १२९ सभासदांची १००% रक्कम सोबतच्या यादी प्रमाणे उर्वरित रक्कम रु.२,३६,७३५/- इतकी १००% रक्कम असे एकुण र.रु.३,४३,९८६/- इतकी रक्कम संबंधीत अभिकर्त्यांना देण्याबाबत **निर्णयास्तव** मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२५/०८/२०२२ ने आलेले **प्रकरणास प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिका**
**प्रशासक ठराव**
**विषय क्र.९२ ठराव क्र.९२ दिनांक. ३०/०८/२०२२**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )**



टि.पी. ०४ फा.प्लॉ.८९ येथील म.न.पा. शाळा क्र.२७ च्या लगत बी.ओ.टी मधुन बांधलेल्या इमारतीच्या वरील तिसरा, चौथा, पाचवा व सहावा मजल्याचे वाणिज्य इमारतीच्या वाढीव इमारत बांधणेकामी मा.सर्वसाधारण ठराव क्र.५३ दि.१५/१२/२०२०, मा.सर्वसाधारण ठराव क्र.६१ दि.१८/०६/२०२१ व मा.सर्वसाधारण ठराव क्र.३२३ दि.२६/११/२०२१ ने ठराव पारित झाला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने वरील तीसरा, चौथा, पाचवा व सहावा मजल्याचे बांधकाम करणेकामी भाडेपट्टा जाहिर लिलाव करणेसाठी विना परतावा रक्कम नमूद करून जाहिर प्रसिध्दीकरण केले होते. सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण सुमारे ०६ ते ०७ वेळा करण्यात आले होते. सदरचे जाहिर प्रसिध्दीकरणास कोणतेही स्वरुपाचे प्रतिसाद मिळाला नाही. यापूर्वीच्या ठरावाप्रमाणे भाडेदर ई ऑक्शन प्रणाली माध्यमातून प्रतिसाद न मिळाल्याने प्रकरणी मा.सहा.संचालक, नगररचना यांचेकडून प्राप्त गाळे भाडे दरामध्ये कपात करून व सदरच्या गाळ्यासाठी निश्चित केलेली विना परतावा रक्कम ऐवजी अनामत रक्कम संबंधीत इच्छुक गाळेधारक यांचेकडून घेऊन सदर प्रस्तावास नमुद केलेली अनामत रक्कम करारपत्राच्या मुदतीअंती (२९ वर्ष ११ महिने नंतर) गाळेधारकास विना व्याज रितसर मागणी केल्यानंतर परत करण्याच्या अनुषंगाने व सदरची कार्यपध्दती निश्चित करणेकामी धोरणत्मक निर्णय होणेसाठी नकाशे व प्रस्तावासह शर्ती व अटी इत्यादी ई ऑक्शन (ऑफलाईन) करणेस प्राप्त देकार इत्यादी सविस्तर छाननी करणे व छाननीअंती प्राप्त देकारच्या अनुषंगाने शॉप ओनर निश्चित करून , शॉप ओनर बरोबर करारपत्र करून घेणे, कार्यादेश देणे इत्यादी बाबी करीता **धोरणात्मक मान्यतेस्व** प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **धोरणात्मक निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२८/०८/२०२२ ने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका